# भारतीय जनता पक्ष
(केंद्रीय कार्यालय)
११, अशोक रोड, नवी दिल्ली- ११०००१
फोन नं. २३००५७००, फक्स- २३००५७८७


दिनांक: ०२ जानेवारी, २०१४

## प्रेस रिलीज

श्री हरदीप सिंघ पुरी यांनी आज भाजपात प्रवेश केला. श्री पुरी हे १९७४ पासून भारतीय विदेश सेवेशी जोडले गेले होते. ३९ वर्षाच्या विशेष कारकिर्दी दरम्यान त्यांनी विदेश आणि संरक्षण मंत्रालया प्रति उच्च पदावर सेवा दिली. ते लंडन आणि ब्राजीलीयातील दुतावासात सेवेत होते तर जिनिव्हा आणि न्यूयॉर्क साठी संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे कायम प्रतिनिधी म्हणून त्यांनी सेवा दिली.

२०११ आणि २०१२ दरम्यान त्यांनी सुरक्षा समितीमध्ये भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्त्व केले होते. ते दहशतवाद विरोधी समितीच्या अध्यक्षपदी होते.

भाजप अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांनी त्यांचे भाजपात स्वागत करताना असे सांगितले की विदेशा बाबत सुरक्षा आणि व्यापार नीती च्या क्षेत्रात त्यांच्या अनुभवाचा भाजपला चांगला फायदा होईल.

श्री पुरी यांनी यावेळी सांगितले की भाजपाची खूप पूर्वीपासून राष्ट्रावादाविषयीची विचारधारा आहे, जी  प्रशंसनीय आहे. त्यामुळे भाजप बरोबर जोडले गेल्याने मला अत्यानंद होत आहे.

पक्षाच्या कार्याला पुढे घेऊन जाण्यासाठी आणि पक्षाचे अध्यक्ष तसेच वरिष्ठ नेतृत्त्वास माझी कोणत्याही प्रकारची गरज असल्यास त्यात सिंहाचा वाटा उचलण्यास मी तयार आहे.

(श्री अरुण कुमार जैन)
कार्यालय सचिव